# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

## नॅक 'अ'+ दर्जा प्राप्त

## परीक्षा व मूल्यमापन मंडळ

## परिपत्रक क्र. परीक्षा/गोपनीय कक्ष/ऑक्टो-२६/२०२६

सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य/परिसंस्थाचे संचालक यांना कळविण्यात येते की, ऑक्टोबर/नोव्हेंबर-२०२६ मध्ये पदवी अभ्यासक्रमांच्या परीक्षा दिनांक २७.१०.२०२६ पासून घेण्यात येणार आहेत. पदव्युत्तर परीक्षाच्या तारखा लवकरच जाहीर करण्यात येतील.

सर्व महाविद्यालयाना विद्यापीठाच्या www.bamua.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर (QPDS) Link देण्यात आलेली आहे. सर्व महाविद्यालयानी त्यांची पूर्ण माहिती **Online** पध्दतीने **दिनांक. ०१.१०.२०२६ ते दिनांक १९.१०.२०२६ पर्यंत माहिती भरण्याची अंतिम संधी राहील** सदर माहिती सर्व कला, विज्ञान, वाणिज्य, व्यावसाइक, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र,विधी, शिक्षणशास्त्र, शारीरिक शिक्षण व इतर सर्व अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांनी **(QPDS) Link** मध्ये माहिती भरणे आवश्यक व अनिवार्य आहे. तसेच दिनांक २१.१०.२०२६ पासून डेमो (Mock Drill) घेण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

**(QPDS) लॉगीन बाबत महत्वाच्या सूचना :-**

०१. **Google Information Form (QPDS) Link:- प्राचार्यांनी महाविद्यालयातील परीक्षेच्या कामासाठी ज्या प्राध्यापकांना केंद्रप्रमुखांची जबाबदारी देण्यात आलेली आहे. त्या प्राध्यापकांनी (QPDS) Link मध्ये माहिती भरावी त्यांच्या व्यतिरिक्त इतर कोणाचीही माहिती सादर करु नये व इतर शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सदरची माहिती सादर करु नये तसे आढळल्यास गैरमार्गाचा अवलंब समजण्यात येईल. परीक्षेच्या लॉगीन ID व पासवर्ड फक्त प्राचार्य व परीक्षा केंद्रप्रमुख यांच्या email ID वरच पाठविण्यात येईल. यानंतर परीक्षेच्या QPDS लॉगीनसाठी OTP व Messages फक्त email ID वरच देण्यात येणार आहे. मोबाईल वर QPDS बाबत कोणतीही माहिती दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.**

०२. **QPDS लॉगीन मध्ये फोटो अपलोड करत असताना प्राचार्य आणि ज्या प्राध्यापकांना केंद्रप्रमूखाची जबाबदारी देण्यात आली आहे त्यांचा फोटो अपलोड करण्यात यावा.**

०३. परीक्षा सुरू झाल्यानंतर विद्यार्थ्यांची उपस्थिती/अनुपस्थिती त्याच दिवशी त्याच सत्रात लॉगीनमध्ये नमूद करण्यासाठी एका प्राध्यापकांची नियुक्ती करण्यात यावी, जेणे करुन निकाल लावण्यास सोयीस्कर होईल.

वरील सूचनांप्रमाणे परीक्षेसाठी माहिती भरत असतांना प्राचार्य आणि केंद्र प्रमुखांनीच माहिती भरणे बंधनकारक राहील. महाविद्यालयाने सादर केलेल्या माहितीनुसार (QPDS) लॉगीन देण्यात येईल. लॉगीन दिल्यानंतर सदर बाब महाविद्यालयाचे प्राचार्य/परीक्षा केंद्रप्रमुख यांच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीस याची माहिती नसावी, या संबंधी गोपनीयतेचे पालन करण्यात यावे. महाविद्यालयाकडून (QPDS) लॉगीन बाबत गैरवापर झाल्यास संबंधीत प्राचार्य/परीक्षा केंद्रप्रमुख जवाबदार असतील, व सदर परीक्षेच्या कामात काही गैरप्रकार आढळल्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम-२०१६-कलम ४८ (४) मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

एखाद्या महाविद्यालयाने माहिती सादर न केल्यास अशा महाविद्यालयांचे विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू शकतील, त्यामुळे सर्व महाविद्यालयांनी माहिती सादर करणे अनिवार्य व क्रमप्राप्त आहे, यानंतरही एखाद्या महाविद्यालयाने माहिती सादर न केल्यास विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत महाविद्यालयांच्या प्राचार्यांची राहील. याची नोंद घ्यावी.

सदर माहिती ही अचूक भरणे बाबतची दक्षता/सर्व प्राचार्य/परीक्षा केंद्र प्रमुख यांनी घ्यावी व माहिती विहित मुदतीत भरुन विद्यापीठ प्रशासनास त्वरित सादर करावे.

संचालक
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

विद्यापीठ प्रांगण,
छत्रपती संभाजीनगर
संदर्भ क्र: परीक्षा व मूल्यमापन/गोपनीय/२०२६/1801
दिनांक;-०१.१०.२०२६